महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१५ वे | दिनांक : १६/११/२०२६ | वार : सोमवार

नाव-फोटोचा अनधिकृत वापर केल्यास कारवाईचा इशारा; चाकणकरांचा ठोंबरेंना इशारा



पुणे : राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या नावाचा, फोटोचा, ओळखीचा आणि वैयक्तिक शैलीचा कोणीही विनापरवानगी व्यावसायिक वापर करू नये, यासाठी ट्रेडमार्क नोंदणी केली आहे, गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशारा दिला आहे. या निर्णयावर प्रतिक्रिया देत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी एक ट्विट करत चाकणकर यांना थेट टोला लगावला आहे. जेव्हा कर्तृत्व आणि चारित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होतात, तेव्हा स्वतःच्या नावाची आणि फोटोची ट्रेडमार्क नोंदणी करावी लागते, अशा शब्दांत उपरोधिक टोला लगावला आहे. अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर येत असलेल्या या चित्रपटात आपली छबी वापरली जात असल्याच्या चर्चेदरम्यान चाकणकरांनी हा कायदेशीर पवित्रा घेतला आहे. यावर रुपाली पाटील ठोंबरे यांनी केलेल्या ट्विटमुळे या वादात आणखी भर पडली असून, महिला नेत्यांमधील हा कलगीतुरा सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. रुपाली चाकणकर म्हणाल्या की, माझे नाव,माझा फोटो,माझी ओळख,माझी वैयक्तिक शैली आणि स्वतःला सादर करण्याची माझी विशिष्ट पद्धत यासंदर्भात ट्रेडमार्क नोंदणी करण्यात आलेली आहे. माझ्या पूर्वपरवानगीशिवाय कोणीही माझे नाव, फोटो,ओळख किंवा माझ्या विशिष्ट शैलीचा स्वतःच्या फायद्यासाठी किंवा व्यावसायिक कारणासाठी कोणत्याही प्रकारचे फोटो,व्हिडिओ, फिल्म,रील,टीझर,प्रमोशन किंवा इतर कोणतेही साहित्य तयार करण्यासाठी,वापरण्यासाठी किंवा प्रसिद्ध करण्यासाठी वापर केल्यास,अशा व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.असे आक्षेपार्ह किंवा बेकायदेशीर साहित्य जप्त करण्याची मागणी केली जाईल आणि संबंधित व्यक्तीला फौजदारी तसेच दिवाणी कायदेशीर कारवाईला व शिक्षेला सामोरे जावे लागेल. यानंतर रुपाली पाटील ठोंबरे यांनी ट्विट करत म्हटलंय की, रुपाली चाकणकर, आता महाराष्ट्राला धमक्या देणे बंद करा आणि प्रश्नांची उत्तरे द्या! राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाची प्रतिष्ठा आणि गरिमा जपण्याऐवजी त्या पदाचा वापर राजकीय स्वार्थासाठी झाल्याचे गंभीर आरोप झाले. अखेर राजीनामा द्यावा लागला. ज्या नेतृत्वाने तुम्हाला या पदावर बसवले, त्यांनीच आता या नियुक्तीबद्दल महाराष्ट्राला उत्तर द्यावे! 1.ट्रेडमार्कचा दावा करता, मग कागदपत्रे दाखवा! कोणत्या ट्रेडमार्कची नोंदणी झाली? त्याचे अधिकृत प्रमाणपत्र काय आहे? संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या नियमांनुसार मंजुरी दिली? पारदर्शकपणे खुलासा करा. 2.माझ्याविरोधात बोलू नका, गुन्हे दाखल करीन, कोर्टात खेचीन अशा धमक्या देऊन जनतेचा आवाज बंद करता येत नाही. कायदा हा कोणाच्या वैयक्तिक मालकीचा नाही. संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि न्याय मागण्याचा अधिकार दिला आहे. 3. महिला आयोगाच्या कार्यकाळातील गंभीर प्रश्नांची उत्तरे द्या! भोंदूबाबा खरात प्रकरणातील तुमची कथित भूमिका, त्याच्या ट्रस्टवरील विश्वस्तपद आणि पत्रकार खेमणार यांच्याशी संबंधित प्रकरणात आयोगाच्या पत्रव्यवहाराबाबत महाराष्ट्राला स्पष्टीकरण द्या.

प्रकाश सोळंकेंची निवडणुकीतून माघार; जयसिंहांकडे राजकीय वारसदारी



बीड : जिल्ह्याच्या राजकारणात माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या एका घोषणेने नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे आमदार असलेल्या प्रकाश सोळंके यांनी आगामी विधानसभा निवडणूक स्वतः लढवणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्याऐवजी आपला पुतण्या जयसिंह सोळंके यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एका विकासकामाच्या शुभारंभप्रसंगी त्यांनी थेट व्यासपीठावरून ही घोषणा केली. त्यामुळे माजलगाव मतदारसंघात सोळंके कुटुंबाच्या राजकीय वारसदाराबाबतचे चित्र स्पष्ट होत असल्याचे मानले जात आहे. राज्यात सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाची चर्चा सुरू आहे. अजित पवार आणि शरद पवार यांच्या गटातील नेत्यांकडून याबाबत वेगवेगळी विधाने केली जात आहेत. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील माजलगावमधून आलेल्या या घोषणेने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे. प्रकाश सोळंके हे माजलगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार असून, आगामी निवडणुकीत ते स्वतः उमेदवार म्हणून जनतेसमोर येणार नसल्याचे त्यांनी सांगितले. एका विकासकामाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रकाश सोळंके यांनी आगामी विधानसभा निवडणुकीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. यापुढे आपण स्वतः निवडणूक लढवणार नसून पुतण्या जयसिंह सोळंके यांना संधी दिली जाईल, असे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे माजलगावच्या राजकारणात आता जयसिंह सोळंके यांच्या संभाव्य उमेदवारीची चर्चा सुरू झाली आहे. प्रकाश सोळंके यांच्या या निर्णयाकडे केवळ निवडणूक न लढवण्याची घोषणा म्हणून पाहिले जात नाही, तर माजलगावमधील सोळंके कुटुंबाच्या राजकीय नेतृत्वातील बदलाची सुरुवात म्हणूनही पाहिले जात आहे. मात्र, या घोषणेतून त्यांनी सक्रिय राजकारणातून पूर्णपणे निवृत्ती घेतल्याचे स्पष्ट होत नाही. त्यांनी आगामी विधानसभा निवडणूक न लढवण्याची भूमिका मांडली आहे. त्यामुळे भविष्यात ते पक्षाच्या राजकारणात आणि मतदारसंघातील राजकीय घडामोडींमध्ये किती सक्रिय राहणार, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, प्रकाश सोळंके यांनी यापूर्वी मंत्रीपद न मिळाल्याबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळात निर्माण झालेल्या संधीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश सोळंके यांनी आपली मंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली होती.

अजित पवारांच्या अपघातावरून रोहित पवारांचे मफलर पोस्टर : मुश्रीफ म्हणाले, '१६ तारखेनंतर बोलू'



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात पुन्हा एकदा मोठा खुलासा करण्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर आणि पुण्यातील डेक्कन परिसरात मफलरचे चित्र असलेले पोस्टर झळकल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या पोस्टरमधून अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, १६ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषद घेऊन रोहित पवार महत्त्वाचा खुलासा करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या पोस्टरवरून वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी रोहित पवार यांना खोचक टोला लगावला आहे. हसन मुश्रीफ यांनी रोहित पवार यांच्या भूमिकेवर उपरोधिक भाष्य केले. ते म्हणाले, "रोहित पवार हे महान नेते आहेत. त्यांनी कुठलातरी शोध लावला होता. ते मागच्या १० तारखेलाच काहीतरी स्पष्ट करणार होते. आता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानसमोर त्यांनी मफलर लटकवला आहे. १६ तारखेनंतर ते काय सांगतात, हे पाहू. त्यानंतर आपण यावर बोलू." असे म्हणत त्यांनी रोहित पवारांच्या आगामी पत्रकार परिषदेवर प्रतिक्रिया दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर या घटनेबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अपघात नेमका कशामुळे झाला, त्यामागे काही वेगळे कारण होते का आणि या प्रकरणातील सर्व बाबी समोर आल्या आहेत का, असे प्रश्न रोहित पवार यांनी यापूर्वीही उपस्थित केले आहेत. आता रोहित पवार यांच्या संदर्भाने मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर आणि पुण्यातील डेक्कन परिसरात लावण्यात आलेल्या पोस्टरमुळे या प्रकरणाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. पोस्टरमध्ये मफलरचे चित्र दाखवण्यात आले असून, अजित पवार यांच्या विमान अपघातामागील सूत्रधारांना पाठीशी घालणारा नेता नेमका कोण, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे पोस्टरवरील मफलर कोणत्या राजकीय नेत्याकडे निर्देश करतो, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू आहेत. रोहित पवार हे १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत अजित पवार यांच्या विमान अपघाताशी संबंधित काही महत्त्वाच्या बाबी मांडल्या जाण्याची शक्यता आहे. पोस्टरमध्ये '१६ नोव्हेंबरला कोणता राजकीय बॉम्ब फुटणार?' असा उल्लेख करण्यात आल्याने या पत्रकार परिषदेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ नोव्हेंबर २०२६

'वाचक व्यासपीठ' उपक्रमात डॉ. ऋषिकेश देशमुख



छत्रपती संभाजीनगर : जीवन विकास ग्रंथालयाच्या 'वाचक व्यासपीठ' या उपक्रमांतर्गत १२ व्या साप्ताहिक बैठकीत वार्धक्यविकार-चिकित्सक डॉ. ऋषिकेश देशमुख उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रम सोमवार दि.१६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता, ग्रंथालयाचे ग्रंथमित्र भा.बा. आर्वीकर सभागृह (१९५, टिळकनगर) येथे होणार आहे. या कार्यक्रमात डॉ. ऋषिकेश अनिल देशमुख हे '६० वर्षानंतरचे वार्धक्यविकार, निदान-उपचार, उतार वयातील काळजी आणि समाधान' यांविषयी उपस्थित वाचकांशी, श्रोत्यांशी संवाद साधतील. या चर्चेअंतर्गत उच्च रक्तदाब, शुगर, अनेक वेगवेगळे आजार एकसोबत, अर्धांगवायू स्ट्रोक , पार्किन्सन, अल्झायमर ह्या सर्व आजारांची काही महत्वाची लक्षणे, या आजारांमुळे मुळे शरीरात होणारे बदल आणि घ्यावयाची काळजी अशा अनेक विषयांवर दृक श्राव्य माध्यमासह चर्चा करतील. आरोग्य विषयाशी संबंधित या बहुउपयोगी बैठकीस नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी, कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर, कोषाध्यक्ष नितीन कंधारकर आणि सहकार्यवाह नृसिंह कुलकर्णी यांनी केले आहे.

माणुसकी जपावे

जगतांना माणसाने,
माणुसकी जपावे.
लळा लावून जिवाला,
सदा हृदयात लपावे. १

दु:खात माणसाला,
आधार प्रेमाने द्यावे.
जिवंत असतांनाच,
खूप काळजी घ्यावे. २

गेल्यावर शोक नको,
जगतांना मदत करावे.
जगता जगता जगात,
आनंदाने सप्तरंग भरावे. ३

गळाभेट घेता घेता,
जिव्हाळा पेरून यावे.
संकटात माणसांच्या,
मदतीस धावून जावे. ४

गर्व मीपणा सोडतांना,
माणसांशी नाते जोडावे.
मनातल्या हेवेदाव्यांना,
क्षमेच्या रबराने खोडावे. ५

रिकाम्या हाती आलो,
रिकाम्या हाती जाणार.
आता ठरवून जगतांना,
माणुसकीचे गीत गाणार. ६



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

भगवान बिरसा मुंडांचे जीवन कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी - संजय खंबायते



कन्नड (अरुण थोरात) : आदिवासी समाजाचे महानायक तथा थोर स्वातंत्र्य सेनानी भगवान बिरसा मुंडा यांचे जीवन कार्य तरुणाई व नागरिकांसाठी प्रेरणादायी असून त्यांचा त्याग, संघर्ष, राष्ट्रभक्तीचे आपण चिंतन व अनुसरण करणे गरजेचे असल्याचे मत भाजप संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी व्यक्त केले आहे.ते अंबाळा ता. कन्नड येथे जि.प.सदस्या मंजुषाताई मलदुडे यांच्या संकल्पनेतून आयोजित जनजाती गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतीमेस अभिवादन करुण, एक हजार दिव्यांचा दीपोत्सव कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. पुढे ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात, भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीनजी यांच्या मार्गदर्शनात भाजप दि.11 ते 18 नोव्हेंबर दरम्यान देशभरात जनजाती गौरव सप्ताह साजरा करीत आहे. देशात 10.4 कोटीहून अधिक जनजाती नागरिक आहेत.देशात 705 पेक्षा जास्त जनजाती जमाती, 239 जिल्ह्यात 10 कोटी हून अधिक जनजाती संख्या आहे. लोकसभेच्या 47 तर विधानसभेच्या 568 जागा या प्रवर्गासाठी राखीव आहेत. या समुहांचे सर्वोतोपरी कल्याण करण्यासाठी देशाचे नेतृत्व प्रयत्नशील आहे. त्यामुळेच देशाच्या पहिले नागरीक राष्टपती एक जनजाती समुहातील महिला बनू शकली.याप्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, जि.प.सदस्या मंजुषाताई मलदुडे, अरुण थोरात, साहेबराव तावरे, दिनकर दाभाडे, महेश मलदुडे, पवन खंडेलवाल, गंगाराम आगीवले, सखाराम भुतांबरे, सुदाम पवार, शशिकांत नागरे, धोंडीराम गांगड, कचरु आवाले, प्रकाश गावंडे, सुरेश गावंडे, देवराव मधे, हौशाबाई उघडे, सुमनबाई गांगड, काळुबाई उघडे, तुळासाबाई आगीवले, सुंदराबाई सुद, आदींसह शेकडो आदिवासी बांधव उपस्थित होते.

क्रांतीसूर्य महामानव भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती कुपटी बुद्रुक येथे उत्साहात साजरी



कुपटी बुद्रुक (सनिराम गावंडे) : क्रांतीसूर्य महामानव भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती कुपटी बुद्रुक येथे मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.या जयंतीचे औचित्य साधून दत्तनगर येथील तरुण मंडळींच्या पुढाकारातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमा फलकाचे अनावरण करण्यात आले.यावेळी गावचे पोलीस पाटील श्री. गंगाधर पंगणवाड, उपसरपंच श्री. माधव डुडुळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष श्री. हनुमंत यंगलवार, पेसा समितीचे अध्यक्ष श्री. गोमाजी कुरुडे, डॉ. नागनाथ डुडुळे, लेखाधिकारी श्री. लक्ष्मण कुरुडे, श्री. रामेश्वर डुडुळे सर, श्री. मारोती काळे पाटील,श्री. दिलीप चामनर श्री. लक्ष्मण वानोळे,श्री.केशव कुरुडे श्री. दत्ता वाकोडे, श्री. उत्तम तोरकड,श्री. दिपक भुसारे, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अन्यायाविरुद्ध दिलेला लढा आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.दत्तनगर येथील तरुण मंडळींनी पुढाकार घेऊन महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले..

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ नोव्हेंबर २०२६

आता आ. विक्रम काळे यांच्यासमोर शिक्षकांच्या टप्पावाढीचे मोठे आव्हान



बीड (भगवंत पाळवदे) : छत्रपती संभाजीनगर विभागाच्या मराठवाडा पदवीधर मतदारसंघात नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे माजी आ.सतीश चव्हाण यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. तब्बल १८ वर्षे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केल्यानंतर मतदारांनी त्यांना नाकारल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या निकालाने केवळ एका उमेदवाराचा पराभव झाला नसून, दीर्घकाळ सत्तेच्या आणि पदाच्या माध्यमातून मतदारांशी असलेला संपर्क कमी झाल्यास त्याची किंमत निवडणुकीत मोजावी लागते, असा संदेशही दिला आहे. आता याच निकालाचे पडसाद आगामी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत उमटण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर महायुतीचे संभाव्य उमेदवार तथा विद्यमान आमदार विक्रम काळे यांच्यासमोर शिक्षकांच्या प्रश्नांचा डोंगर उभा राहिला आहे. विशेषतः शिक्षकांच्या टप्पावाढीचा प्रश्न त्यांच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा होत असली, तरी अपेक्षित काळात निर्णय होत नसल्याने शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर वाढत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासने आणि घोषणांना शिक्षक भुलणार नाहीत, तर प्रत्यक्ष निर्णय झाला तरच विश्वास ठेवतील, अशी भूमिका शिक्षकांमधून पुढे येत आहे.----------

-------वीस वर्षांच्या प्रतिनिधित्वाचा हिशेब शिक्षक मागणार!आमदार विक्रम काळे हे २००६ पासून शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. जवळपास दोन दशकांच्या या कालखंडात त्यांनी शिक्षकांचे अनेक प्रश्न शासनदरबारी मांडल्याचे सांगितले जात असले, तरी टप्पावाढीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे. मोठमोठ्या घोषणा आणि आश्वासनांपेक्षा शिक्षकांच्या जीवनाशी निगडित प्रश्न मार्गी लागणे महत्त्वाचे असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.आता आगामी निवडणुकीपूर्वी त्यांच्याकडे साधारण एक वर्षाचा कालावधी आहे. या कालावधीत शिक्षकांच्या टप्पावाढीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी शासनावर प्रभावी दबाव निर्माण करणे आवश्यक आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये त्यांचा समावेश असल्याने निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यामुळे शिक्षकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्याची जबाबदारीही त्यांच्यावर अधिक आहे.---

---

मार्च महिन्यातील टप्पावाढीचा निर्णय ठरणार निर्णायक!जुलै महिन्यात झालेल्या शिक्षकांच्या आंदोलनाच्या वेळी शासनाकडून १ एप्रिलपासून टप्पावाढ लागू करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.या प्रश्नावर मंत्री व ना.गिरीश महाजन यांनी मध्यस्थीची भूमिका बजावली होती. त्यामुळे आता मार्च महिन्यात शासनाकडून यासंदर्भात कोणता निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण शिक्षकवर्गाचे लक्ष लागले आहे.शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार मार्चमध्ये टप्पावाढीचा निर्णय झाला आणि १ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी झाली, तर शिक्षकांमधील नाराजी कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र, पुन्हा एकदा आश्वासनांचीच पुनरावृत्ती झाली आणि निर्णय लांबणीवर पडला, तर त्याचे राजकीय परिणाम आमदार विक्रम काळे यांना भोगावे लागू शकतात. शिक्षकांच्या मनातील असंतोष मतपेटीतून व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.---

---

आ.रोहित पवारांची शिक्षकांशी जवळीक; आंदोलनातील सहभागाची सर्वत्र चर्चा!शिक्षकांच्या प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाने आगामी निवडणुकीच्या राजकारणालाही वेगळे वळण दिले आहे. आमदार रोहित पवार यांनी शिक्षकांच्या आंदोलनात स्वतः सहभाग घेत आझाद मैदानावर ठाण मांडले होते. शिक्षकांच्या मागण्यांसाठी त्यांनी घेतलेली भूमिका आणि आंदोलनातील प्रत्यक्ष सहभाग यामुळे शिक्षकांमध्ये त्यांच्याविषयी सहानुभूती आणि आपुलकी निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.विशेष म्हणजे डॉ. नरेंद्र काळे यांनीही शिक्षकांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. ते केवळ आंदोलनात सहभागी झाले नाहीत, तर शिक्षकांच्या प्रश्नांशी एकरूप होत आंदोलनस्थळी मुक्कामालाही राहिले. आंदोलनाच्या काळात शिक्षकांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची त्यांची भूमिका शिक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.दुसरीकडे, आ. विक्रम काळे किंवा त्यांच्या निकटवर्तीयांचा आंदोलनस्थळी अपेक्षित सहभाग दिसून आला नसल्याची नाराजी काही शिक्षक व्यक्त करीत आहेत. शिक्षकांच्या या भावनेचा आगामी निवडणुकीत कितपत परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.----------

---------- डॉ. नरेंद्र काळे यांचे आव्हान ठरणार महत्त्वाचे! आगामी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत डॉ. नरेंद्र काळे यांच्या भूमिकेकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. शिक्षकांच्या आंदोलनात प्रत्यक्ष उतरून त्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांशी आपली बांधिलकी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आमदार विक्रम काळे यांच्यासमोर केवळ राजकीय प्रतिस्पर्ध्याचे नव्हे, तर शिक्षकांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्या नेतृत्वाचे आव्हान उभे राहिले आहे.पदवीधर मतदारसंघात सतीश चव्हाण यांना मिळालेला पराभव हा आ.विक्रम काळे यांच्यासाठी एक राजकीय इशारा मानला जात आहे. दीर्घकाळ मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले म्हणजे मतदारांचा पाठिंबा कायम राहतोच असे नाही. मतदारांच्या प्रश्नांना प्राधान्य, प्रत्यक्ष काम आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क या गोष्टीच निवडणुकीत निर्णायक ठरतात, हे पदवीधर निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट झाले आहे.----------

------- सतीश चव्हाण यांच्यानंतर आता विक्रम काळेंची सत्व परीक्षा! पदवीधर मतदारसंघात १८ वर्षांच्या प्रतिनिधित्वानंतर सतीश चव्हाण यांना पराभवाचा सामना करावा लागला. आता शिक्षक मतदारसंघात जवळपास २० वर्षांपासून प्रतिनिधित्व करणाऱ्या विक्रम काळे यांच्यासमोरही अशाच प्रकारची राजकीय परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अर्थात, दोन्ही मतदारसंघांचे प्रश्न आणि राजकीय समीकरणे वेगवेगळी असली, तरी मतदारांच्या नाराजीचा कौल हा कोणत्याही प्रस्थापित नेतृत्वासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो.आता शिक्षकांच्या मनात एकच प्रश्न आहे, तो म्हणजे टप्पावाढीचा प्रश्न नेमका कधी सुटणार? मार्च महिन्यात शासन निर्णय घेणार की पुन्हा आश्वासनांवरच बोळवण होणार? आमदार विक्रम काळे हे आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करून शिक्षकांना न्याय मिळवून देणार का? की डॉ. नरेंद्र काळे यांच्या माध्यमातून शिक्षक मतदारसंघात नवे राजकीय समीकरण आकाराला येणार?आगामी निवडणुकीचे चित्र आजच स्पष्ट होणार नसले, तरी एक गोष्ट मात्र निश्चित आहेशिक्षकांना आता आश्वासन नको, तर निर्णय हवा आहे. टप्पावाढ झाली तर विश्वास टिकेल; अन्यथा 'करा नाही तर घरी बसा' हा शिक्षकांचा संदेश आमदार विक्रम काळे यांच्या राजकीय भवितव्याला मोठे आव्हान देऊ शकतो!

मी पुन्हा येईल पाऊस असा काही म्हणला नाही



दर वर्षी येणारा पाऊस
मी पुन्हा येईल
असा काही म्हणला नाही...

यावर्षी पाऊस नाही
सूर्य नुसता आग ओकतो आहे
जमिनीचं पोट वाळवंट झालं आहे
साचलेल्या पाण्याच्या बाता तू मारू नको
साचलेलं पाणी टिकेल, या भ्रमात राहू नको

पुढच्या वर्षी पाऊस पडेल
याची शाश्वती तू देऊ नको
बेअक्कली माणसा
अक्कल थोडी गहाण घे

यावर्षी आलो नाही, पुढच्या वर्षी येईल
पावसानं असा काही बॉण्ड करुन दिला नाही
मी पुन्हा येईल
पाऊस असा काही म्हणला नाही...

बेअक्कली माणसा, तुझ्या वयाच्या
चारपट मोठी झाडं तोडून
कुपोषित झुडपं लावू म्हणतो
झाडं वाढवणं तुला
शब्दांचा खेळ वाटतो आहे

लगेच पाणी नसेल तेव्हा
पाण्याविना तू लावलेली झुडपं
शंभर वर्षाची कधी होणार आहे
साचलेल्या पाण्याच्या बाता तू मारु नको

यावर्षी आलो नाही, पुढच्या वर्षी येईल
पावसानं असा काही बॉण्ड करुन दिला नाही
मी पुन्हा येईल,
पाऊस असा काही म्हणला नाही...

दहा फूट झाड वाढवण्यासाठी
एकाच खड्ड्यात कितीदा तू रोप लावणार
झाडं वाढवण्यासाठी पाणी कुठून आणणार
जमिनीचं पोट आधीच वाळवंट झालं आहे

नाशिवंत धनाच्या दुनियेतून बाहेर ये जरा
दुष्काळी दुनिया उघड्या डोळ्याने पहा जरा
दुष्काळी चित्र बदलणं, निसर्गाशिवाय
कुणाच्या बापाच्या हातात नाय गड्या

यावर्षी आलो नाही, पुढच्या वर्षी येईल
पावसानं असा काही बॉण्ड करुन दिला नाही
मी पुन्हा येईल,
पाऊस असा काही म्हणला नाही...

लक्ष्मण वाल्डे
+91 88886 06068

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ नोव्हेंबर २०२६

सहिष्णुता : सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा आधार - डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी १६ नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन' म्हणून साजरा केला जातो. विविध धर्म, भाषा, संस्कृती, परंपरा, विचारधारा आणि जीवनपद्धती असलेल्या समाजघटकांमध्ये परस्पर आदर, समजूतदारपणा, स्वीकारशीलता आणि बंधुभाव निर्माण व्हावा, हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. मानवसमाजाची रचना विविधतेवर आधारलेली आहे. प्रत्येक व्यक्तीचे विचार, श्रद्धा, आवडीनिवडी, जीवनशैली आणि सामाजिक अनुभव वेगवेगळे असतात. ही विविधता समाजाचे वैभव असते. मात्र, या विविधतेचा स्वीकार करण्याऐवजी तिच्याकडे संशयाने, तुच्छतेने किंवा द्वेषाच्या भावनेने पाहिले, तर सामाजिक संघर्ष, भेदभाव आणि हिंसाचाराला खतपाणी मिळते. म्हणूनच शांततापूर्ण, न्याय्य आणि समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी सहिष्णुता हे अत्यंत महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. सहिष्णुता म्हणजे केवळ दुसऱ्याचे विचार सहन करणे नव्हे, तर त्याच्या वेगळेपणाचा आदर करून त्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार मान्य करणे होय.आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या संकल्पनेला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) १९९५ हे वर्ष सहिष्णुतेसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले होते. त्याच वर्षी १६ नोव्हेंबर रोजी युनेस्कोच्या सदस्य राष्ट्रांनी 'सहिष्णुतेच्या तत्त्वांविषयीची घोषणा' स्वीकारली. या घोषणेमध्ये सहिष्णुतेला शांतता, लोकशाही, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचा महत्त्वपूर्ण आधार मानण्यात आले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने १९९६ मध्ये १६ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन म्हणून पाळण्याचे आवाहन केले. जगभरातील समाजांमध्ये वाढणारा धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि वैचारिक संघर्ष कमी करून परस्पर समजूतदारपणा वाढविणे, हा या दिवसाचा व्यापक हेतू आहे. त्यामुळे हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी संधी आहे.सहिष्णुता ही संकल्पना व्यापक आणि बहुआयामी आहे. व्यक्तीचे विचार आपल्यापेक्षा वेगळे असू शकतात, तिची धार्मिक श्रद्धा आपल्यापेक्षा भिन्न असू शकते किंवा तिची जीवनशैली आपल्या परंपरेशी जुळणारी नसू शकते. मात्र, या कारणांमुळे त्या व्यक्तीचा अवमान करणे, तिच्यावर बंधने लादणे किंवा तिच्या अधिकारांचे उल्लंघन करणे योग्य ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार मांडण्याचे, श्रद्धा बाळगण्याचे, संस्कृतीचे पालन करण्याचे आणि सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता. सहिष्णुता ही दुर्बलता नसून मानसिक परिपक्वता, विवेकशीलता आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. स्वतःच्या मतांवर ठाम राहूनही दुसऱ्याच्या मतांचा आदर करता येणे, ही खऱ्या अर्थाने सहिष्णु वृत्ती होय. अर्थात, सहिष्णुता म्हणजे अन्याय, शोषण, हिंसा, अत्याचार किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन मुकाटपणे सहन करणे नव्हे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविताना मानवी प्रतिष्ठेचा आदर राखणे आणि विवेकपूर्ण मार्गाने संघर्ष करणेही तितकेच आवश्यक आहे.भारतीय समाजाच्या रचनेमध्ये सहिष्णुतेला विशेष महत्त्व आहे. भारत हा विविध धर्म, भाषा, जाती, जमाती, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती, वेशभूषा, सण-उत्सव आणि सामाजिक चालीरीती वेगवेगळ्या आहेत. तरीही या विविधतेमध्ये एकात्मतेची भावना टिकून आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार प्रदान केले आहेत. संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे. ही मूल्ये सहिष्णुतेच्या पायावर उभी आहेत. धर्म, भाषा, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्या आधारावर कोणताही नागरिक कनिष्ठ ठरू नये, ही भारतीय लोकशाहीची मूलभूत भूमिका आहे. त्यामुळे सहिष्णुता ही केवळ वैयक्तिक सद्गुणाची बाब नसून भारतीय संविधानिक लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेले सामाजिक मूल्य आहे.भारतीय इतिहासात विविध विचारप्रवाह, तत्त्वज्ञान आणि सामाजिक चळवळींनी सहिष्णुतेची शिकवण दिलेली आहे. तथागत गौतम बुद्धांनी करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसेच्या माध्यमातून मानवतेचा संदेश दिला. व्यक्तीने विवेकाचा वापर करून सत्याचा शोध घ्यावा आणि सर्व प्राणिमात्रांविषयी करुणेची भावना ठेवावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. सम्राट अशोकाने कलिंग युद्धानंतर हिंसेचा त्याग करून धम्मविजयाचा मार्ग स्वीकारला. विविध धार्मिक संप्रदायांविषयी आदर बाळगण्याचा आणि परस्परांचा सन्मान करण्याचा संदेश त्याने दिला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत नामदेव आणि इतर संतपरंपरेतील विचारवंतांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक विषमता, जातिभेद आणि स्त्रीशिक्षणावरील बंधने यांविरुद्ध संघर्ष केला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि समतेसाठी कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीचा विचार मांडला. या सर्व विचारवंतांच्या कार्यातून सहिष्णुता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व स्पष्ट होते.सहिष्णुतेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आदर. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या श्रद्धेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचा भाग असली, तरी तिचा वापर दुसऱ्या व्यक्तीविषयी द्वेष निर्माण करण्यासाठी होऊ नये. कोणताही धर्म मानवतेपेक्षा मोठा नाही आणि कोणतीही धार्मिक ओळख दुसऱ्या व्यक्तीचा अपमान करण्याचा अधिकार देत नाही. धार्मिक विविधतेचा स्वीकार करून परस्परांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे, एकमेकांच्या परंपरांची माहिती घेणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे आवश्यक आहे. सांस्कृतिक सहिष्णुतेमुळे विविध समुदायांमधील अंतर कमी होते. लोक एकमेकांच्या जीवनपद्धती समजून घेतात आणि परस्परांविषयी विश्वास निर्माण होतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक बळकट होते.भारतीय समाजात भाषिक सहिष्णुतेलाही विशेष महत्त्व आहे. भारतामध्ये अनेक भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक वारसा आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा अवमान होऊ नये. भाषिक विविधतेचा स्वीकार केल्याने सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाच्या भाषा, बोली, लोककला, परंपरा आणि ज्ञानपद्धती यांचे जतन करणे हीदेखील सहिष्णुतेची व्यापक अभिव्यक्ती आहे. वारली, भिल्ल, कोकणा आणि इतर आदिवासी समुदायांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे मागासलेपणाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांना समाजाच्या सांस्कृतिक संपत्तीचा भाग मानले पाहिजे. विविधतेचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने समावेशक आणि प्रगतिशील ठरतो.आजच्या काळात जातीय आणि सामाजिक सहिष्णुतेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. भारतीय समाजात जात, वर्ग, लिंग, आर्थिक स्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या आधारावर अनेक प्रकारच्या विषमता आढळतात. अस्पृश्यता, जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, स्त्री-पुरुष असमानता आणि वंचित घटकांवरील अन्याय या समस्या अजूनही पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत सहिष्णुतेचा अर्थ केवळ वेगवेगळ्या समुदायांना एकत्र राहू देणे एवढाच मर्यादित असता कामा नये. प्रत्येक व्यक्तीला समान संधी, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यामध्ये असली पाहिजे. समाजातील दुर्बल, वंचित, आदिवासी, अल्पसंख्याक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या समस्या समजून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि त्यांच्या अधिकारांसाठी सकारात्मक भूमिका घेणे ही सामाजिक सहिष्णुतेची खरी कसोटी आहे.सहिष्णु समाजनिर्मितीमध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण हे केवळ माहिती आणि ज्ञान संपादन करण्याचे साधन नसून व्यक्तीच्या विचारसरणीला आकार देणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विवेकनिष्ठ विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करता येते. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि समाजघटकांविषयी वस्तुनिष्ठ माहिती दिली पाहिजे. विद्यार्थ्यांना परस्परांच्या मतांचा आदर करण्याची, मतभेद शांततेने सोडविण्याची आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला विरोध करण्याची शिकवण मिळाली पाहिजे. वादविवाद, समूहचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम यांच्या माध्यमातून सहिष्णुतेची मूल्ये रुजविता येतात. शिक्षकांनी आपल्या वर्तनातून समानता, न्याय, आदर आणि सहकार्याचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुता ही केवळ पाठ्यपुस्तकातून शिकण्याची गोष्ट नसून दैनंदिन व्यवहारातून आत्मसात करण्याचे जीवनमूल्य आहे.लोकशाही व्यवस्थेच्या यशासाठीदेखील सहिष्णुता अपरिहार्य आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, शासनाच्या धोरणांवर टीका करण्याचा आणि सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याचा अधिकार असतो. मात्र, मतभिन्नता निर्माण झाली म्हणून विरोधकांना शत्रू समजणे ही लोकशाहीविरोधी मानसिकता आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मतांचा आदर करणे, शांततापूर्ण चर्चा करणे आणि तर्काच्या आधारे मतपरिवर्तन स्वीकारणे आवश्यक असते. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक नेतृत्व यांनी आपल्या भाषणातून आणि कृतीतून सामाजिक सलोखा टिकविण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. मतभेद असणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे; परंतु मनभेद, द्वेष आणि हिंसाचार निर्माण होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे वैचारिक मतभिन्नतेला संघर्षाचे नव्हे, तर संवादाचे माध्यम बनविणे गरजेचे आहे.जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे जग जवळ आले आहे. विविध देशांतील लोकांचे विचार, संस्कृती आणि जीवनशैली यांच्याशी परिचित होण्याच्या संधी वाढल्या आहेत. त्याचबरोबर सांस्कृतिक गैरसमज, धार्मिक पूर्वग्रह, वांशिक भेदभाव आणि असहिष्णुतेच्या घटनाही अनेक ठिकाणी दिसून येतात. स्थलांतरित नागरिक, निर्वासित आणि अल्पसंख्याक समुदायांना अनेकदा सामाजिक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. वंश, त्वचेचा रंग, राष्ट्रीयत्व किंवा सांस्कृतिक ओळख यांच्या आधारावर व्यक्तीचे मूल्यमापन करणे ही अन्यायकारक प्रवृत्ती आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य, संवाद आणि परस्पर आदर आवश्यक आहे. युद्ध, दहशतवाद, धार्मिक कट्टरता आणि हिंसक संघर्ष यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन मानवतेच्या समान मूल्यांची आठवण करून देतो.डिजिटल युगामध्ये सहिष्णुतेसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. समाजमाध्यमांमुळे प्रत्येक व्यक्तीला आपले मत व्यक्त करण्यासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. मात्र, त्याच माध्यमांचा वापर करून अफवा, द्वेषपूर्ण संदेश, दिशाभूल करणारी माहिती आणि अपमानास्पद मजकूर पसरविला जात आहे. अनेकदा एखाद्या घटनेची सत्यता पडताळून न पाहता संदेश पुढे पाठविले जातात. धार्मिक, जातीय किंवा राजकीय विषयांवरून समाजमाध्यमांमध्ये परस्परांविषयी द्वेष निर्माण केला जातो. आभासी जगातील अशा वर्तनाचे परिणाम प्रत्यक्ष सामाजिक जीवनावर होऊ शकतात. त्यामुळे डिजिटल सहिष्णुता ही काळाची गरज बनली आहे. समाजमाध्यमांवर मत व्यक्त करताना भाषेचे भान ठेवणे, दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आदर करणे, माहितीची सत्यता तपासणे आणि द्वेषपूर्ण मजकूर प्रसारित न करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ दुसऱ्याचा अपमान करण्याचे स्वातंत्र्य असा होत नाही. जबाबदार डिजिटल नागरिकत्व हे सहिष्णु समाजाच्या निर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे.कुटुंब ही सहिष्णुतेची पहिली पाठशाळा आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कुटुंबातील वातावरणातून होत असते. पालकांनी मुलांना लहानपणापासूनच सर्व व्यक्तींशी आदराने वागण्याची शिकवण दिली पाहिजे. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करणे, घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवांचा आदर करणे, लहानांच्या मतांना महत्त्व देणे आणि कुटुंबातील मतभेद संवादातून सोडविणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी मैत्री करण्यास मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुसऱ्याच्या अडचणी समजून घेणे, गरजू व्यक्तींना मदत करणे आणि कोणाचाही अपमान न करणे या सवयी बालपणापासून विकसित झाल्या, तर भविष्यात संवेदनशील नागरिक घडू शकतात. सहिष्णुता ही केवळ सार्वजनिक जीवनापुरती मर्यादित नसून कुटुंबातील नातेसंबंध अधिक सुदृढ करणारी भावना आहे.स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही सहिष्णुतेचे महत्त्व अधोरेखित करावे लागते. महिलांना शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, निर्णयप्रक्रिया आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांमध्ये समान संधी मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या विचारांना, आवडीनिवडींना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला मान्यता देणे ही सहिष्णुतेचीच अभिव्यक्ती आहे. त्याचप्रमाणे तृतीयपंथीय व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील इतर दुर्लक्षित घटक यांच्या अस्तित्वाचा व अधिकारांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या शारीरिक स्थिती, लिंगभाव, सामाजिक ओळख किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारे तिच्याशी भेदभाव केला जाऊ नये. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता यावे, यासाठी सार्वजनिक सुविधा, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सहिष्णुता आणि समावेशकता यांचा समन्वय साधल्याशिवाय सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही.आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी करण्यासाठीही सहिष्णु दृष्टिकोन आवश्यक आहे. समाजातील श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण, शिक्षित आणि अशिक्षित तसेच विकसित आणि अविकसित भागांतील अंतर कमी करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींकडे तुच्छतेने पाहण्याऐवजी त्यांच्या परिस्थितीमागील सामाजिक आणि आर्थिक कारणे समजून घेतली पाहिजेत. रोजगार, आरोग्य, शिक्षण, निवारा आणि सामाजिक सुरक्षा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी शासनाबरोबरच सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला पाहिजे. सहिष्णु समाज हा केवळ विविधतेचा स्वीकार करणारा नसतो, तर प्रत्येक व्यक्तीला प्रगतीची समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न करणारा समाज असतो. त्यामुळे सहिष्णुतेचा संबंध सामाजिक उत्तरदायित्व आणि कल्याणकारी विकासाशीही जोडलेला आहे.सहिष्णुता वाढविण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांनी सामाजिक प्रश्न मांडताना वस्तुनिष्ठता आणि जबाबदारीचे भान राखले पाहिजे. विविध समुदायांमधील सकारात्मक उपक्रम, सामाजिक सहकार्य आणि एकात्मतेच्या उदाहरणांना प्रसिद्धी दिली पाहिजे. सामाजिक संस्थांनी आंतरधर्मीय संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण, युवक शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. सार्वजनिक ठिकाणी भेदभावविरहित वर्तनाला प्रोत्साहन दिले पाहिजे. द्वेषपूर्ण भाषण, सामाजिक बहिष्कार आणि हिंसक प्रवृत्ती यांना कायद्याच्या चौकटीत प्रतिबंध करणेही आवश्यक आहे. सहिष्णुतेचे मूल्य समाजात रुजविण्यासाठी केवळ एका दिवसाचे कार्यक्रम पुरेसे नसून त्याची अंमलबजावणी दैनंदिन जीवनात होणे महत्त्वाचे आहे.आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन हा प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरात, कार्यस्थळी, शैक्षणिक संस्थेत आणि सार्वजनिक जीवनात इतरांशी कसे वागतो, याचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्यापेक्षा वेगळे विचार मांडणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकण्याची तयारी आहे का, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आपण आदर करतो का, भेदभावाच्या घटनांविरुद्ध आपण भूमिका घेतो का आणि समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी आपले योगदान काय आहे, असे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. सहिष्णुतेची सुरुवात व्यक्तीच्या मनातून होते आणि तिचा विस्तार कुटुंब, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण जगापर्यंत होतो. छोट्या-छोट्या कृतींमधूनही मोठे सामाजिक परिवर्तन घडविता येते.आज मानवजातीला विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाबरोबरच मानवी संवेदनशीलतेचीही नितांत गरज आहे. भौतिक प्रगतीच्या शर्यतीत माणुसकी, परस्पर आदर आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये मागे पडता कामा नयेत. विचारांमधील विविधता ही संघर्षाचे कारण न बनता ज्ञानवृद्धी आणि सामाजिक प्रगतीचे साधन ठरली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीवरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाच्या आधारे केली पाहिजे. सहिष्णुता ही शांततेची पूर्वअट, लोकशाहीची शक्ती आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या निमित्ताने विविधतेचा आदर, मतभिन्नतेचा स्वीकार, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुतेतूनच विश्वास निर्माण होतो, विश्वासातून बंधुभाव वाढतो आणि बंधुभावातून शांततापूर्ण, समताधिष्ठित व मानवतावादी समाजाची निर्मिती होते. विविधतेचा आदर, विचारांचा स्वीकार आणि माणुसकीचा सन्मान हाच सहिष्णु समाजाचा खरा पाया आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १६ नोव्हेंबर २०२६

घरट्यांचा आक्रोश... हरवत चाललेलं आभाळ!

पहाटेची वेळ... पूर्वेकडून सूर्याची कोवळी किरणे धरतीवर अलगद पसरू लागतात. झाडांच्या हिरव्यागार फांद्यांवर पक्ष्यांचा मंजुळ किलबिलाट सुरू होतो. कोकीळेचे कुंजन, चिमण्यांची चिवचिव आणि पानांच्या सळसळीत मिसळलेले पाखरांचे स्वर... अवघी सृष्टी जणू नव्या दिवसाच्या स्वागतासाठी सूर आळवत असते. ही केवळ सकाळ नसते, तर निसर्गाने धरतीवर साकारलेली एक सुंदर मैफल असते. मात्र, आज या निसर्गमैफलीत एक प्रश्न अस्वस्थ करतोय... उद्या हेच सूर ऐकू आले नाहीत तर? झाडांच्या फांद्यांवर घरटीच उरली नाहीत, तर या आभाळाला अर्थ तरी काय उरेल?रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील साईडोंगर परिसराकडे पाहिले की या प्रश्नाची दाहकता प्रकर्षाने जाणवते. या परिसरातील अनेक वृक्षांची कत्तल झाल्याने पाखरांचा नैसर्गिक अधिवास उद्ध्वस्त झाला आहे. ज्या झाडांच्या फांद्यांवर कधीकाळी शेकडो पक्ष्यांचा किलबिलाट घुमायचा, तिथे आज शांततेची भयाण चादर पसरली आहे. कालपर्यंत पाखरांच्या गाण्यांनी गजबजलेला हा परिसर आज त्यांच्या अनुपस्थितीची वेदनादायी कहाणी सांगत आहे. झाडे तोडली गेली, फांद्या तुटल्या आणि त्यांच्यासोबत कित्येक मुक्या जीवांचा संसारही विस्कटला!सह्याद्रीच्या कुशीत फुललेलं जैवविविधतेचं विश्व!सह्याद्री म्हणजे केवळ उंचच उंच डोंगररांगा नव्हेत, तर निसर्गाने हजारो वर्षांच्या अथक साधनेतून घडवलेले जैवविविधतेचे समृद्ध मंदिर आहे. येथील वृक्षांनी कित्येक उन्हाळे सोसले, पावसाच्या असंख्य सरी झेलल्या आणि वादळांचे तडाखे सहन करत आपल्या मुळांनी धरतीला घट्ट कवटाळून ठेवले. काळ बदलला, ऋतू बदलले, पिढ्या बदलल्या; मात्र या वृक्षांच्या कुशीत वसलेले पक्षी, कीटक, फुलपाखरे आणि वन्यजीवांचे विश्व पिढ्यान्‌पिढ्या फुलत राहिले.एखादे जुने झाड म्हणजे निसर्गाच्या पुस्तकातील एक जिवंत प्रकरण असते. त्याच्या प्रत्येक फांदीवर एखादे घरटे, खोडाच्या ढोलीत एखाद्या जीवाचा निवारा, तर मुळांभोवती असंख्य सजीवांचे अस्तित्व दडलेले असते. ती झाडे केवळ लाकूड नसतात; ती असंख्य जीवांची घरे, अनेक पिढ्यांची आश्रयस्थाने आणि निसर्गाच्या अखंड जीवनचक्राचा आधार असतात. मात्र, विकासाच्या नावाखाली याच जीवनदायी संपत्तीवर कुऱ्हाड चालवली जात आहे.चिमणी काडीकाडी गोळा करून आपले छोटेसे घरटे विणते. सुगरण आपल्या अद्भुत कलाकुसरीने फांदीला लटकणारे देखणे घरटे तयार करते. पोपट झाडाच्या ढोलीत निवारा शोधतो, तर साळुंकी, बुलबुल, कोकीळ आणि असंख्य पक्षी फांद्यांवर आपला संसार थाटतात. कुठे अंडी उबवली जात असतात, कुठे पिल्लांची चिवचिव सुरू असते, तर कुठे आई-पक्षी चोचीतून दाणे भरवत आपल्या पिल्लांचे पोट भरत असते. या छोट्याशा घरट्यात त्यांचे संपूर्ण जग सामावलेले असते.कल्पना करा... एखादे पाखरू चोचीत दाणे घेऊन आपल्या घरट्याकडे परतते; मात्र समोर त्याला घरट्याची जागाच दिसत नाही. ज्या फांदीवर त्याने आपले विश्व उभे केले होते, ती फांदीच कुऱ्हाडीने तोडलेली असते. त्याची अंडी, पिल्ले आणि निवारा क्षणात नाहीसा झालेला असतो. ते पाखरू पुन्हा पुन्हा त्या परिसरात भिरभिरते; परिचित फांद्या शोधते, आपल्या घरट्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करते; पण त्याला सापडतो तो केवळ उजाड झालेला परिसर!पाखरांना बोलता येत नाही, म्हणून त्यांना वेदना होत नाहीत असे नाही. त्यांनाही घरट्याची ओढ असते, पिल्लांची माया असते आणि आपल्या निवाऱ्याशी भावनिक नाते असते. माणसाला आपल्या घराचा अभिमान असतो, मग पाखरांच्या घरट्याचे मोल कमी कसे? फरक एवढाच की माणूस आपली वेदना शब्दांत मांडू शकतो; पण या मुक्या जीवांचा आक्रोश ऐकण्यासाठी संवेदनशील मन लागते.माणसाला जमिनीवरील जागा अपुरी वाटू लागली, म्हणून त्याने उंचच उंच इमारती उभारल्या. सिमेंट-काँक्रीटच्या जंगलांनी हिरव्यागार वनराईची जागा घेतली. विकासाच्या शर्यतीत माणसाने जमिनीवरच नव्हे, तर आकाशाच्या मोकळेपणावरही अतिक्रमण सुरू केले. मात्र, या पाखरांना ना आलिशान बंगले हवेत, ना गगनचुंबी इमारती! त्यांना हवी असते फक्त झाडाची एखादी सुरक्षित फांदी, घरटे बांधण्यासाठी थोडी जागा आणि मुक्तपणे भरारी घेण्यासाठी मोकळे आभाळ!पण दुर्दैव असे की माणूस स्वतःच्या सुखसोयींचा विस्तार करताना इतर जीवांच्या जगण्याची जागाच संकुचित करत चालला आहे. मोबाईल टॉवर, विद्युत तारांचे जाळे, काचेच्या उंच इमारती आणि बेसुमार शहरीकरण यामुळे पक्ष्यांसमोरील आव्हाने अधिकच वाढत आहेत. नैसर्गिक अधिवास नष्ट होणे, अन्न-पाण्याची कमतरता आणि मानवनिर्मित अडथळे यांचा परिणाम अनेक पक्ष्यांच्या अस्तित्वावर होत आहे.पक्षी म्हणजे केवळ पहाटेचे सुरेल संगीत नव्हे, तर निसर्गाच्या संतुलनाचे महत्त्वाचे घटक आहेत. ते बिया दूरवर पसरवून वनस्पतींच्या पुनरुत्पादनाला हातभार लावतात. अनेक पक्षी कीटकांवर नियंत्रण ठेवतात. मधमाशा आणि फुलपाखरे परागीभवनाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात. या संपूर्ण परिसंस्थेतील प्रत्येक जीवाचे स्वतःचे एक स्थान आणि महत्त्व आहे. या साखळीतील एखादा दुवा तुटला, तर त्याचे पडसाद संपूर्ण पर्यावरणावर उमटतात.जंगलांचा ऱ्हास झाला की केवळ पक्ष्यांचेच नव्हे, तर वन्यप्राण्यांचेही अस्तित्व धोक्यात येते. अन्न आणि पाण्याच्या शोधात वन्यप्राणी मानवी वस्तीकडे धाव घेतात. त्यातून मानव आणि वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होतो. पण या संघर्षाची मुळे शोधली, तर अनेकदा त्यामागे माणसानेच हिरावून घेतलेला त्यांचा नैसर्गिक अधिवास दिसून येतो. जंगल हे वन्यजीवांचे घर आहे. त्यांचे घर उद्ध्वस्त करून त्यांनी कुठे जावे, असा प्रश्न आपण स्वतःलाच विचारायला हवा.वृक्षतोडीनंतर पर्याय म्हणून नवीन झाडे लावण्याच्या घोषणा केल्या जातात. वृक्षारोपणाचे कार्यक्रम होतात, छायाचित्रे प्रसिद्ध होतात आणि पर्यावरण रक्षणाच्या शपथा घेतल्या जातात. मात्र, केवळ रोपे लावून जंगल तयार होत नाही. एखाद्या वृक्षाला डेरेदार होण्यासाठी, त्याच्या फांद्यांवर पक्ष्यांनी घरटी बांधण्यासाठी आणि त्याच्या कुशीत जैवविविधतेचे विश्व फुलण्यासाठी अनेक वर्षे लागतात.आज तोडलेल्या शेकडो वर्षांच्या वृक्षाची भरपाई उद्या लावलेल्या छोट्याशा रोपट्याने होऊ शकत नाही. म्हणूनच वृक्षारोपणाइतकेच नव्हे, तर त्याहून अधिक महत्त्वाचे आहे ते अस्तित्वात असलेल्या जुन्या वृक्षांचे आणि नैसर्गिक जंगलांचे संरक्षण करणे. निसर्गाचे संवर्धन हे कागदावरील घोषणा आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये.सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या, घनदाट वनराई, खळाळणारे झरे, हिरवीगार शिवारं आणि पक्ष्यांचा किलबिलाट हे महाराष्ट्राच्या नैसर्गिक वैभवाचे खरे अलंकार आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण शांततेत घालवण्यासाठी, डोंगरांचे सौंदर्य अनुभवण्यासाठी आणि पक्ष्यांचे स्वर ऐकण्यासाठी पर्यटक दूरदूरून येतात. पण विकासाच्या नावाखाली हेच डोंगर, जंगले आणि नैसर्गिक अधिवास उद्ध्वस्त झाले, तर पर्यटनासाठी उरणार काय?निसर्गाची संपत्ती नष्ट करून निसर्ग पर्यटनाचा विकास करण्याचा विचार म्हणजे स्वतःच्या पायाखालची जमीनच खणण्यासारखा आहे. डोंगर, जंगल, झरे आणि जैवविविधता हीच सह्याद्रीच्या पर्यटनाची खरी ओळख आहे. तीच हरवली, तर उरतील फक्त काँक्रीटच्या भिंती आणि आठवणींचे ओसाड प्रदेश!साईडोंगर परिसरातील वृक्षतोडीचा प्रश्न हा केवळ एका डोंगरापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न आहे निसर्गाच्या अस्तित्वाचा, जैवविविधतेच्या संरक्षणाचा आणि भविष्यातील पिढ्यांच्या हक्काचा! आज आपण या विनाशाकडे डोळेझाक केली, तर उद्या विकासाच्या नावाखाली आणखी कितीतरी डोंगर, जंगले आणि नैसर्गिक अधिवास उद्ध्वस्त होण्याची भीती आहे.आपल्या पुढच्या पिढीला सह्याद्रीचे हिरवेगार डोंगर, झाडांवरील घरटी, चिमण्यांची चिवचिव आणि आकाशात मुक्तपणे भरारी घेणारी पाखरे प्रत्यक्ष पाहता यायला हवीत. त्यांना पाखरांची ओळख करून देण्यासाठी मोबाईलमधील छायाचित्रे दाखवण्याची वेळ येऊ नये. भविष्यातील मुलांनी झाडावरचे घरटे केवळ पुस्तकात पाहावे, चिमणीचा आवाज केवळ ध्वनिमुद्रणातून ऐकावा आणि जंगलाचे सौंदर्य केवळ इतिहासातील वर्णनातून अनुभवावे, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते?संत तुकाराम महाराजांनी निसर्गाशी असलेले माणसाचे नाते किती सुंदर शब्दांत व्यक्त केले आहे..."वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।पक्षीही सुस्वरे आळविती॥"या अभंगातील विचार केवळ आध्यात्मिक नाही, तर निसर्गाशी असलेल्या आपल्या सहजीवनाची जाणीव करून देणारा आहे. वृक्ष, वेली, पशुपक्षी हे आपले सोयरे आहेत, ही भावना आपल्या जगण्यात रुजली पाहिजे. विकास हवा, प्रगती हवी; मात्र ती निसर्गाच्या मुळावर उठणारी नसावी. कारण निसर्गाचा विनाश करून मिळवलेला विकास हा खऱ्या अर्थाने विकास असूच शकत नाही.आज गरज आहे ती साईडोंगरसह सह्याद्रीच्या नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन करण्याची, वृक्षतोडीला आळा घालण्याची आणि उरलेली हिरवाई जपण्याची. संबंधित यंत्रणांनी या परिसरातील वृक्षतोडीची वस्तुस्थिती तपासून आवश्यक ती संरक्षणात्मक पावले उचलली पाहिजेत.ज्या झाडांनी पाखरांना घर दिले, सावली दिली आणि जगण्याचा आधार दिला, त्याच झाडांच्या मुळावर आपण घाव घालत असू, तर उद्या या आभाळात भरारी घेणारे पाखरू उरणार तरी कसे?आज झाडांच्या फांद्या तुटत आहेत, घरटी उद्ध्वस्त होत आहेत आणि पाखरांचा चिवचिवाट हरवत चालला आहे. त्यांच्या मुक्या आक्रोशाकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर उद्याची पहाट उजाडेल; पण त्या पहाटेला निसर्गाची सुरेल मैफल मात्र नसेल!कारण लक्षात ठेवा... जंगल संपले तर घरटी संपतील, घरटी संपली तर चिवचिवाट हरवेल आणि चिवचिवाट हरवला तर माणसाच्या जगण्यातील निसर्गाचा एक सुंदर सूर कायमचा हरवून जाईल!



सुवर्णा साठे | माढा, सोलापूर

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.